



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १५०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१२ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## 'दुबार मतदार आला तर त्याला फोडा', राज ठाकरे शिवाजी पार्कात कडाडले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेसाठी तब्बल २० वर्षांनंतर ठाकरे बंधू उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे शिवाजी पार्कच्या (शिवतीर्थ) व्यासपीठावर एकत्र आले. या ऐतिहासिक क्षणी राज ठाकरे आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. राज ठाकरे म्हणाले की, आज प्रबोधनकार, बाळासाहेब आणि आई-वडील इथे असायला हवे होते. बाळासाहेबांसोबत अनेकदा या मैदानावर आलो होतो, त्या आठवणींना उजाळा देताना राज ठाकरे भावनाविवश झाले.




दरम्यान, यावेळी राज ठाकरेंनी दोन भाऊ मुंबईवर आलेल्या संकटामुळे एकत्र आले आहेत, असे नमूद केले. श्रीकांत ठाकरे, बाळासाहेब ठाकरे आणि आई हे सर्वजण वरून आमचा हा लढा पाहत असतील, असे उद्गारही त्यांनी काढले. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर कडाडून टीका केली आणि सरकार पैशाच्या जोरावर सर्व विकत घेण्याच्या गुर्मीत असल्याचा आरोप केला.

**- जाहीर माफी !**

राज ठाकरे यांनी भरसभेत कार्यकर्त्यांची माफी मागितली. २० वर्षांनंतर युती करताना अनेकांना तिकीट देता आले नाही, काहीजण नाराज झाले किंवा काहींनी दुसरी वाट धरली, हे मान्य करत त्यांनी कोणालाही दुखवण्याचा हेतू नसल्याचे स्पष्ट केले आणि दिलगिरी व्यक्त केली.

**- गौतम अदानींवर घणाघात**

देशातील सगळी विमानतळं आणि बंदरं गौतम अदानींच्या ताब्यात आहेत. राज ठाकरेंनी अदानींकडे असलेल्या प्रकल्पांच्या यादीचं वाचन करुन दाखवलं. अदानींना मिळालेल्या उद्योगांवरुन राज ठाकरेंकडून टीका. अदानींवरुन सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. एकाच माणसावर एवढी मेहेरबानी का? असा सवालही राज ठाकरेंनी यावेळी उपस्थित केला.

**- दुबार मतदार आला तर...**

भाषणाच्या शेवटी राज ठाकरे म्हणाले, 'मराठी माणसासाठी ही शेवटची निवडणूक आहे. आज जक चुकलात तर कायमचे मुकलात म्हणून समजा. आज जर तुमच्या हातातून ही शहरं यांच्या हातात गेली. तर उद्या राजानं मारलं अन् पावसानं झोडलं, तर तक्रार कोणाकडे करणार, आज माझी इतर पक्षातील मराठी लोकांनाही माझं आवाहन आहे. सोडा ते सगळं. मराठी माणसासाठी एक व्हा, या मुंबईसाठी एक व्हा, या महाराष्ट्रासाठी एक व्हा', असं राज ठाकरे म्हणाले.

'या इतक्या वर्षांच्या परंपरेने, इतक्या लोकांच्या तपश्चर्येने ही मुंबई महाराष्ट्राला मिळाली. १०७ आमचे हुतात्मे गेले. ही मुंबई गेली तर पुतळ्यांना काय अर्थ उरतो. पुतळे म्हणतील आमचा मराठी माणूस बेसावध राहीला म्हणून मुंबई गमवावी लागली. सत्तेच काय करु, आम्ही सत्तेशिवायसुद्धा इतक्या वर्ष लाथा घातल्याच ना, अनेक अंगावर आले त्यांना तुडवलंच ना. पण तुम्हाला या सगळ्या सत्ताधाऱ्यांचा माज या निवडणुकीत उतरवायचा आहे. तुम्हाला एवढचं सांगणं आहे. बेसावध राहू नका.

इव्हिएम मशीनवरती लक्ष ठेवा. सकाळी ६ वाजता सगळे नेमलेले लोक सेंटरवरती पाहिजेत. दोन्ही पक्षातल्या लोकांना सांगतो आपल्यात काही वाद नाही. आता खरी लढाई त्यांच्याशी आहे. आपसात लढू नका. त्यांना हवं ते करु नका. बेसावध राहू नका. जर दुबार मतदार तिकडे आला तर सकाळी ७ वाजता फोडून काढा', असं आवाहन राज ठाकरेंनी यावेळी केलं आहे.

## किन्हवली पोलिसांनी केले हातभट्टी दारूचे अड्डे उध्वस्त

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.११, शहापूर (ठाणे) :** गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळताच किन्हवली पोलिसांनी खरपत गावाच्या हद्दीत शाही नदीकिनारी व नामपाडा गावच्या जवळ झाडाझुडपात गैर कायदा गावठी दारू बनवण्याचा व विक्री करण्याचा छुपा धंदा चालत असल्याच समजताच, ठाणे पोलीस अध्यक्षक डी एस स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, शहापूर पोलीस विभागीय अधिकारी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करून कारवाई करण्यात आली.



दारू बनवण्यासाठी एकूण चार ड्रम, २०० लिटरचे दोन तास लिटरचे दोन असे एकूण २९ हजार ५०० चा मुद्देमाल व नामपाडा हद्दीत चार ड्रम ५० लिटरचे एकूण १४५०० एवढा मुद्देमाल एकूण ४४००० गैरकायदा असून जागीच त्याचा नाश करण्यात आला.

सदर दारूचे हातभट्टी अड्डे बाळू विठ्ठल शिंदे व कैलास सोमा निरगुडा त्यांचे असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांच्यावर भारतीय असहिता अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## १४ राज्यांत दहशतीचे साम्राज्य!

### २० वर्षांचा लपंडाव संपला 'रेहमान डकैत' अखेर पोलिसांच्या जाळ्यात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, सुरत :** बनावट सीबीआय अधिकारी बनून देशातील १४ राज्यांच्या पोलिसांना तब्बल दोन दशके हुलकावणी देणारा कुख्यात गुन्हेगार आबिद अली उर्फ ' राजू इराणी ' उर्फ रेहमान डकैत याच्या मुसक्या आवळण्यात सुरत गुन्हे शाखेला यश आले आहे. भोपाळच्या कुख्यात 'इराणी डेरा' येथून सहा टोळ्यांचे नेटवर्क चालवणारा हा गुन्हेगार एका मोठ्या कटाच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

**विना गोळीबार थरारक कारवाई**

सुरतच्या लालगेट भागात पोलिसांनी अतिशय नियोजनबद्ध सापळा रचला होता. कोणत्याही रप्रकारचा गोळीबार न करता पोलिसांनी या डॉनला झडप घालून पकडले. विशेष म्हणजे, गेल्या डिसेंबरमध्ये भोपाळ पोलिसांनी १५० कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह कोम्बिंग ऑपरेशन करूनही तो निसटला होता. मात्र, यावेळी सुरत गुन्हे शाखेच्या अचूक माहितीसमोर त्याचे सर्व डावपेच अपयशी ठरले.

**गुन्हेगारीचे 'कॉर्पोरेट' मॉडेल आणि आलिशान जीवन**

राजू इराणी आपली टोळी एखाद्या कॉर्पोरेट कंपनीप्रमाणे चालवत असे. जर टोळीचा एखादा सदस्य पकडला गेला, तर त्याच्या जामिनाचा खर्च आणि कुटुंबाची जबाबदारी राजू स्वतः उचलत असे. स्वतःला 'रेहमान डकैत' म्हणवून घेणाऱ्या या गुंडाला आलिशान आयुष्याची प्रचंड आवड होती.

**ताफ्यात काय होते?**

महागड्या स्पोर्ट्स बाईक्स, आलिशान कार आणि किमती अरबी घोडे. टोळीचे सदस्य सफारी सूट घालून फिरत. वृद्ध लोकांना 'सुरक्षा तपासणी'च्या नावाखाली गाठायचे आणि




स्वतः सीबीआय अधिकारी किंवा साधू असल्याचे भासवून त्यांना लुटायचे.

**महाराष्ट्रात 'मकोका' अन् रीलची आवड...**

राजू इराणीवर महाराष्ट्रात मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. पुणे, भिवंडी, दिल्ली आणि कोलकाता अशा मोठ्या शहरांमध्ये त्याच्यावर २००६ पासून अपहरण, दरोडा आणि खुनाच्या प्रयत्नाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. गुन्हेगारीच्या जगात दहशत असूनही, त्याला सोशल मीडियावर 'रील' बनवण्याची प्रचंड आवड होती, ज्यातून तो आपली रेहमान डकैत ओळख मिरवत असे.

**महिला-मुलांची ढाल अन् क्रूरता**

पोलिसांनी जेव्हा जेव्हा त्याच्या घरावर छापे टाकले, तेव्हा तो घरातील महिला आणि लहान मुलांना ढाल म्हणून पुढे करायचा आणि स्वतः पसार व्हायचा. पोलिसांना खबऱ्यांची माहिती देणाऱ्यांना जिवंत जाळण्यापर्यंत या टोळीची मजल गेली होती. भोपाळ रेल्वे स्थानक परिसरातील सरकारी जमिनीवर कब्जा करून त्याने स्वतःची गुन्हेगारी छावणी उभी केली होती.

## मोबाईलच्या युगात मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे कौतुकास्पद : आ. मुनगंटीवार

### साखरवाही येथे पुरुषांच्या भव्य कबड्डी सामन्यांचे उद्घाटन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** मोबाईलच्या युगात मैदानी खेळ व पारंपरिक संस्कृती मागे पडत आहे. अशा परिस्थितीत मैदानी कबड्डी स्पर्धा आयोजित करून आपली परंपरा जपली जात आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. कार्यक्रमास्थळापर्यंत आ. मुनगंटीवार यांची बैलबंडीवरून लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली.



आ. मुनगंटीवार यांची बैलबंडीवर मिरवणूक आणि लाडूतुला

तसेच लाडूतुला करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अनेक वर्षांनंतर बैलबंडीवर बसण्याचा योग आल्याची भावना आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. प्रेमाने व आपुलकीने केलेल्या स्वागताबद्दल साखरवाहीतील कार्यकर्ते व ग्रामस्थांचे त्यांनी आभारही मानले.

चंद्रपूर तालुक्यातील साखरवाही येथे जगदंब क्रीडा मंडळ व जय बजरंग क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुषांच्या भव्य कबड्डी सामन्यांचे उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महिंद्र गावंडे, श्रेयस भालेराव, ब्रिजभूषण पाझारे, अनिल डोंगरे, शोभाताई पिदूरकर, विनोद खापने, सुरेश सोयाम, सिद्धार्थ कवाडे, रामभाऊ कडुकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. आ.४ मुनगंटीवार म्हणाले, '१९९५ ते २००९ मी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. येथील नागरिकांनी मला कायमच प्रेम आणि आशिर्वाद दिले. त्यामुळे येथील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे निमंत्रण दिले, तेव्हा आनंदाने स्वीकारले. जवळपास पंधरा वर्षांनी आपल्याला भेटताना आनंद होत आहे. या गावाच्या सेवेसाठी कधीही आवाज द्या, तुमच्यासाठी धावून येईल. कारण १९९५ मध्ये तुम्ही निवडून दिले नसते तर मी आज शेतकऱ्यांचे, उपेक्षितांचे प्रश्न विधानसभेत मांडू शकलो नसतो.'

## नागपुरात भरदिवसा अल्पवयीन बहीण-भावावर प्राणघातक हल्ला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नागपूर :** नागपूर शहरात पुन्हा एकदा प्रेमसंबंधांच्या वादातून टोकाची आणि भयावह हिंसा समोर आली आहे. यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिवळी नदी परिसरात अल्पवयीन मुलगी आणि तिच्या भावावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रेमसंबंधांतील असहिष्णुता आणि वाढती हिंसा हा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल संतापे (रा. यशोधरा नगर) असे आरोपीचे नाव असून तो पीडित अल्पवयीन मुलीच्या शेजारी राहत होता. पूर्वी आरोपी आणि मुलगी यांच्यात ओळख होती. मात्र कुटुंबीयांच्या हस्तक्षेपानंतर मुलीने आरोपीपासून स्पष्टपणे अंतर ठेवले होते.

याच गोष्टीचा राग आणि संशय आरोपीच्या मनात साचत गेला. मुलीचे इतर कोणासोबत संबंध असल्याचा संशय त्याने डोक्यात धरला आणि त्यातूनच ही भीषण घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेच्या दिवशी आरोपीने आधी मुलीच्या भावाशी वाद घातला. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही क्षणातच हा वाद हिंसक झाला. संतापाच्या भरात आरोपीने चाकू काढून मुलीच्या भावावर वार केले. अचानक झालेल्या हल्लयात तो गंभीर जखमी झाला. भावाला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या अल्पवयीन मुलीवरही आरोपीने निर्दयपणे चाकूचे वार केले. काही क्षणांतच संपूर्ण परिसर रक्तरंजित झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी भावंडांना मेयो रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांची प्रकृती गंभीर होती, मात्र वेळेवर उपचार मिळाल्याने सध्या त्यांची स्थिती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# आजची युवा पिढी...



जगातील सर्वात तरुण जन देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे.

याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही.

पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल.

सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते.

गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## बांगलादेशचे काय होणार?



बांगलादेशच्या दोन माजी महिला पंतप्रधान खालिदा झिया व शेख हसीना तेथील राजकीय पटलावरून नाहिशा झाल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात तेथील राजकीय चित्र कसे असेल, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. शेख हसीना यांना विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सत्ता तर सोडावी लागलीच; पण आता त्यांच्या अवामी लीग पक्षातही त्यांच्या अनुपस्थितीने नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. येत्या फेब्रुवारीतील निवडणुकीत या पक्षावर बंदी घालण्यात आली आहे. शेख हसीना यांच्या परोक्ष हा पक्ष कोण व कसा चालवणार हे स्पष्ट नाही आणि नजीकच्या काळात हसीना मायदेशी परतण्याची शक्यता कमी आहे. तशा अवस्थेत हसीना यांची पक्षावरील पकड ढिली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे खालिदा झिया यांच्या निधनानंतर त्यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे नेतृत्व त्यांचे चिरंजीव तारीक झिया यांच्याकडे गेले आहे. हा पक्ष झिया खानदानाची खासगी मालमत्ता असल्यासारखाच आहे, त्यामुळे या पक्षातही प्रबळ अशी नेतृत्वाची दुसरी फळी नाही. तारीक झिया यांना आईच्या निधनामुळे निर्माण झालेल्या सहानुभुतीचा लाभ मिळणार आहे. खालिदा यांच्या निधनाच्या निमित्ताने जागतिक नेत्यांनी तारीक यांची भेट घेऊन सांत्वन व्यक्त केल्यामुळेही तारीक यांच्या नेतृत्वावर जागतिक शिक्कामोर्तब झाले आहे. निवडणुकीतला पारंपरिक प्रतिस्पर्धी पक्ष अवामी लीगची स्पर्धा नसल्यामुळे बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा (बीएनपी) मार्ग सुलभ झाला आहे व तोच पक्ष सत्तेवर येईल, असे भाकीत केले जात आहे. 'जमाते इस्लामी' या कट्टर इस्लामवादी पक्षाने आपली प्रतिमा सुधारण्यासाठी सध्या काही राजकीय तडजोडी सुरू केल्या आहेत. देशात हा पक्ष एकीकडे आंदोलक विद्यार्थ्यांच्या नॅशनल सिटिझन पार्टीशी निवडणूक समझोता करीत आहे; तर दुसरीकडे बीएनपी सत्तेवर आली तर तिच्या सरकारमध्ये सहयोगी पक्ष म्हणून सामील होण्याची भाषा करीत आहे. या पक्षाचे नेते अमीर शफिकुर रहमान यांनी बीएनपी सत्तेवर येण्याची शक्यता गृहीत धरली आहे.

या निवडणुकीतील चौथी शक्ती आंदोलक विद्यार्थ्यांची 'नॅशनल सिटिझन पार्टी' ही आहे. पण जमाते इस्लामीशी निवडणूक समझोता करण्याच्या प्रश्नावरून या पक्षात उभी फूट पडली आहे व पक्षाच्या अनेक महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनी जमाते इस्लामीशी समझोता करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे शेख हसीना यांच्याविरोधातील आंदोलनाच्या वेळी जी एक विद्यार्थी शक्ती निर्माण झाली होती ती आता क्षीण झाली आहे. गेल्या वर्षी शेख हसीना यांना ज्या कारणांसाठी जनक्षोभ आंदोलनानंतर पदच्युत करण्यात आले होते, ती कारणे नवे हंगामी सरकार आल्यानंतरही कायम राहिली आहेत, किंबहुना त्यांची तीव्रता आता अधिक वाढली आहे. हंगामी सरकारने नवी व्यवस्था होइपर्यंत कारभार करावा व लवकरात लवकर निवडणुका घ्याव्यात अशी अपेक्षा असताना युनूस सरकार धोरणविषयक निर्णय घेत सुटले आहे. युनुस निवडणुकीसही टाळाटाळ करीत होते, त्यामुळे परिस्थिती गुंतागुंतीची होत चालली होती. पण काही राजकीय पक्ष आणि आंतरराष्ट्रीय दबाव यामुळे युनूस सरकारने येत्या फेब्रुवारीत निवडणुका घेण्याची घोषणा केली. पण त्यामुळे परिस्थिती शांत होण्याऐवजी आणखीनच बिघडते आहे. त्यातच जनक्षोभ आंदोलनाच्या नेत्याची हत्या, माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे निधन, तारीक झिया यांचे राजकीय आगमन, कट्टर इस्लामवादाचा पुन्हा उदय आणि हिंदू व्यक्तींची हत्या यामुळे बांगलादेश अराजकात सापडल्यासारखे चित्र आहे. या परिस्थितीत बांगलादेशची वाटचाल कशी होणार व त्याचे भारताला काय परिणाम भोगावे लागणार, असे प्रश्न आहेत. बांगलादेशातील हंगामी सरकारचे प्रमुख महंमद युनूस यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहे, पण त्यांना फारसा जनाधार नाही. निवडणुकीनंतरच्या राजकीय व्यवस्थेत आपले स्थान काय असेल, हा प्रश्न युनूस यांना भेडसावत आहे. युनूस यांनी आपले स्थान भक्कम करण्यासाठी भारतद्वेषाला खतपाणी घातले आहे, इस्लामी कट्टरवाद्यांना हाताशी धरले आहे व विद्यार्थी आंदोलकांमध्ये फूट पाडण्याच्या हालचाली केल्या आहेत. आंदोलक विद्यार्थी नेता शरीफ ओसमान हादी याच्या हत्येत सरकारातील काही लोकांचा हात असल्याचा आरोप काही विद्यार्थी नेत्यांनी केला आहे. पण युनूससमर्थक या हत्येत भारताचा हात असल्याचे सुचवीत आहेत.

खालिदा झिया यांचे चिरंजीव तारीक यांचे १७ वर्षाच्या विजनवासातून देशात झालेले आगमन आणि खालिदा यांचे निधन या दोन घटनांचा बांगलादेशच्या निवडणुकीच्या राजकारणावर मोठा प्रभाव पडेल, हे निश्चित आहे. अवामी पार्टीचे कार्यकर्ते येत्या निवडणुकीत तटस्थ राहतात, की बीएनपीच्या पारड्यात आपले वजन टाकतात हेही पहावे लागेल. भारतात आश्रयास आलेल्या अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना यांनी खालिदा झिया यांना जुने मतभेद विसरून श्रद्धांजली वाहिली आहे. भारतानेही खालिदा झिया यांच्या अंत्यविधीसाठी परराष्ट्रमंत्री जयशंकर यांना पाठवून बीएनपीच्या पारड्यात वजन टाकले आहे. भारताने आपल्या बांगलादेश धोरणात योग्य ते बदल केले आहेत व तेथील नव्या राजकीय परिस्थितीशी जुळवून घेण्याचे संकेत दिले आहेत. भारताच्या एका राजनयिक अधिकाऱ्याने आपली भेट घेतली होती. असा गौप्यस्फोटही 'जमाते इस्लामी'चे नेते सफिकुर रहमान यांनी केला आहे. याचा अर्थ भारताने बांगलादेशच्या नव्या राजकीय रचनेत जमाते इस्लामीचा मोठा सहभाग गृहीत धरला आहे. एकूणच भारताचे सध्या 'वेट अँड वॉच' असे धोरण आहे.

# मानवतेचा दीपस्तंभ राजमाता जिजाऊ



१६ व्या शतकाचा काळ हा महाराष्ट्रातील भोळ्या भाबड्या गरीब जनतेची पिळवणूक करणारा अमानुष काळ होता.महाराष्ट्राच्या पावन भुमित सर्व काही आलबेल नव्हते. शेजारच्या राज्यातील दुष्ट शाही राजे महाराष्ट्रावर आक्रमण करत,येथील जनतेला छळत आणि जेवढी लुटून नेता येईल तेवढी संपत्ती लुटून नेत असत.इथल्या संतांनी आपल्या कार्याने प्रबोधन करण्याचा प्रयत्न चालवला होता. परंतु,शेजारी असणाऱ्या दुष्ट शाही राज्य व्यवस्थेतील सैनिक मनात आले तेव्हा महाराष्ट्रात येत आणि महाराष्ट्रातील जनतेची छळवणूक करत.अशा या काळात महाराष्ट्रात मानवतेचा दीपस्तंभ प्रज्वलित करणाऱ्या आणि स्वराज्याची दूरदृष्टी असणाऱ्या राजमाता जिजाऊ यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला.

राजमाता जिजाऊ यांच्या आई म्हाळसाबाई जाधव आणि वडील लखोजीराजे जाधव यांनी लहान वयाच्या जिजाऊंना विविध क्षेत्राचे

शिक्षण दिले.जिजाऊंना लहान वयापासून अन्यायाची चीड होती. म्हणून तर त्यांनी बालवयात खेळाला महत्त्व न देता हातात तलवार व ढाल घेऊन युद्ध कौशल्य आत्मसात केले. कोणावर अन्याय झाला तर अन्याय करणाऱ्या व्यक्तीला चांगली शिक्षा देण्याची धमक त्यांच्यात होती.अशा या कणखर बाण्याच्या जिजाऊंना त्यांच्या चार भावांनी युध्दनितीचे, मानवतेचे, व्यवहाराचे, सर्व शास्त्रांचे आणि अनेक भाषांचे शिक्षण दिले. १६१३ साली वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी राजमाता जिजाऊ यांचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला. आणि सुरू झाली जिजाऊंची दुसरी जीवन लढाई. त्यांना ज्ञात झाली महाराष्ट्राची दयनीय अवस्था. मराठी मुलुखातील मराठी माणसांनी दुसऱ्यांच्या दरबारात किती दिवस चाकरी करायची?दुसऱ्यांच्या राज्यासाठी किती दिवस आपले रक्त सांडलेले पाहायचे?त्यापेक्षा आपण आपले स्वतःचे,रयतेचे स्वराज्य निर्माण का करू नये?हा मनोदय त्यांनी शहाजीराजांना बोलून दाखवला. स्वराज्याची किती आवश्यकता आहे हे पटवून दिले.स्वराज्याची संकल्पना शहाजीराजेंना खूप आवडली.त्यांनी संमती दर्शवली. आणि जिजाऊंनी स्वराज्य स्थापनेची तयारी सुरू केली.

१९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला.बाळ शिवबांचे तेजस्वी रूप पाहून राजमाता जिजाऊ मनोमन प्रफुल्लित झाल्या.बहुजन जनतेचा स्वराज्य संस्थापक जन्माला आल्याचे समाधान त्यांना लाभले. आणि त्याचवेळी त्यांनी मराठी मुलुखाचा स्वराज्य संस्थापक घडवण्याचा दृढनिश्चय केला.त्यांनी बाल शिवबांना शूर विरांच्या कथा सांगायला सुरूवात केली.त्यांनी अचूक वेळ साधत शिवबांच्या मनात संस्कार,धाडसीपणा,करारी बाणा,कणखर वृत्तीचे बीज पेरताना स्वराज्य म्हणजे काय हे समजावून सांगितले.मातृत्वाच्या मायेखाली जिजाऊंनी शिवरायांना युध्दनितीचे शिक्षण दिले.आदर्श राजा कसा असावा?हे ही अनेक वेळा समजावून सांगितले. राजाने प्रजेशी कसे वागावे हे समजावून सांगितले. राजाच्या मनात प्रजेबद्दल स्नेह, आपुलकी,आदरभाव,धर्मनिरपेक्ष वृत्ती,स्त्री सन्मान,आणि समान न्याय हे गुण असलेच पाहिजे हे ही पटवून सांगितले.आणि म्हणून बाल शिवाजी मावळ प्रांतात शूर वीर मावळे शोधताना त्यांच्या घरी जाऊन आस्थेवाईकपणे चौकशी करत आणि स्वराज्याची स्थापना करण्यासाठी योगदान देण्याची विनंती करत.

राजमाता जिजाऊ यांच्या अंगी एक राजमाता म्हणून जेवढे गुण होते ते सगळे गुण एक आदर्श राजा म्हणून शिवाजी महाराजांच्या ठायी अवतरले. याचे सगळे श्रेय जिजाऊंना जाते.छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होण्याच्या अगोदर जी तयारी करणे गरजेचे होते,जी सामग्री जमवणे गरजेचे होते आणि सैन्य म्हणून जीवाभावाचे मावळे जमवणे अत्यंत आवश्यक होते ते सगळे जुळविण्यात जिजाऊंचा सिंहाचा वाटा होता,त्यांचेच अमूल्य मार्गदर्शन लाभत होते.राज्याभिषेक पार पडल्यानंतर,स्वराज्य स्थापन झाल्यानंतर,रयतेचे राज्य निर्माण केल्यानंतर राजमाता जिजाऊंचे स्वराज्याचे स्वप्न अखेर पूर्ण झाले.

जेव्हा जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज मोहिमांवर जात असत तेव्हा तेव्हा माँसाहेब जिजाऊ यांनी राज्यकारभार सांभाळला.छत्रपती शिवाजी राजे आदर्श राजे झाले पण ते जनतेचे राजे होते,बहुजन जनतेच्या जीवनात सोन्याचे दिवस आणणारे राजे होते.त्यांच्या शिवशाही मध्ये शेतकरी,मजूर व सर्व रयत सुखी होती. हे पाहून राजमाता जिजाऊंच्या चेहऱ्यावर आगळावेगळा आनंद पसरत असे.

तलवारीच्या जोरावर स्वराज्य स्थापन झाले पण ते स्वराज्य राजमाता जिजाऊ यांच्या अलौकिक अशा मातृत्वाने घडविले.त्यांच्या प्रबळ इच्छाशक्ती मुळे स्वराज्य प्रत्यक्षात साकारले गेले.महाराष्ट्रभुमितील अमानुषता नष्ट होऊन मानवतेचे पर्व सुरू झाले.मानवतेचा व स्वराज्याचा दीपस्तंभ असणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या अलौकिक कार्याला व जयंतीनिमित्त माँसाहेब जिजाऊ यांना कोटी कोटी वंदन!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

Poem कट्टा

## कावडी

युवा झाले पाणक्या
खांद्यावर धरे कावडी
अभिषेक घाले तुम्हां
असून आमची बावडी

अनुभव हवा अजूनि
वाटत राहतात रेवडी
साक्षीदार सारे तुमचे
तुमच्या हाता चावडी

सारीपाट सजे तुमचा
मोल तरूणा कवडी
सोंगट्यांचे सोंग चाले
प्यादी बारकी दवडी

पंगती बसे वरिष्ठांच्या
तरुणाई शिते चिवडी
वाढप्याची कामे करा
सांभाळे सर्वं आवडी

बुढ्यांची परिषद चाले
ठरल्या आधी निवडी
युवाहवा रखवालदार
गरज फक्त ही एवढी

नव्या रक्ता प्रोत्साहन
जाहिरात गाजे केवढी
पुढे आली तुमची पिढी
काळजी घेतली तेवढी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वरच्या विकासासाठी ६४.६५ कोटींचा निधी मंजूर



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.११, महाबळेश्वर :** केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य २०२५-२६ या महत्त्वपूर्ण योजनेतून महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेला मोठा निधी प्राप्त झाला आहे. नगर विकास विभागामार्फत शहरातील विविध विकासकामांसाठी एकूण ६४ कोटी ६५ लाख २४ हजार ६१६ रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती महाबळेश्वर गिरीस्थान नगर परिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी दिली.

विकास कामांच्या निधीबाबत नगर परिषदेमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष सुनिल शिंदे, नगरसेवक नासिर मुलाणी, अफझल सुतार, संतोष शिंदे, रविंद्र कुंभारदरे, संजय जंगम, संतोष आखाडे, राहुल पिसाळ, रोहित ढेबे व नगरसेविका विमलताई पार्टे ,विद्या बावळेकर, पल्लवी कोंढाळकर, संगीता वाडकर, प्रियंका वायदंडे, रेश्मा ढेबे इत्यादी उपस्थित होते.

या मंजूर निधीतून प्रामुख्याने नगरपरिषदेची नवी ओळख निर्माण करणारी प्रशासकीय इमारत आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

**मंजूर झालेली प्रमुख कामे खालीलप्रमाणे आहेत:**

नूतन प्रशासकीय इमारत: महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे भव्य बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना सर्व प्रशासकीय सेवा एकाच छताखाली आणि आधुनिक सुविधेत उपलब्ध होतील.

रस्ते काँक्रीटीकरण (तापोळा रोड ते जुना सातारा रोड): तापोळा रोडपासून ससून रोड, जन्नीमाता सोसायटी ते जुना सातारा रोडपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येईल. तसेच पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्या कडेला 'पावसाळी गटर' (डींऑ थरींशअॅ ॄअॅरळप) बांधण्यात येणार आहे.

माखरीया हायस्कूल परिसर विकास: माखरीया हायस्कूल ते तापोळा रोड नगरपरिषद हद्दीपर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार असून, याच मार्गावर एका पुलाचे बांधकामही प्रस्तावित आहे.

पर्यटन मार्गाचे सक्षमीकरण: पर्यटकांची वर्दळ असलेल्या क्षेत्र महाबळेश्वर रोडवरील आर.आर. हेरिटेज रिसॉर्ट कॉर्नर ते ग्लेनगिरी बंगलो ते लॉडविक पॉईंट रोडपर्यंतच्या रस्त्याचे संपूर्ण काँक्रीटीकरण केले जाणार आहे.

पर्यटन आणि स्थानिक सोयींना प्राधान्य महाबळेश्वर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ असल्याने येथील रस्त्यांची स्थिती चांगली असणे आवश्यक आहे. काँक्रीटीकरणामुळे रस्त्यांचे आयुष्य वाढणार असून पावसाळ्यात होणारी दुरवस्था थांबणार आहे. यामुख्याधिकारी योगेश पाटील यांची माहिती दिली विकास कामांच्या प्रशासकीय मान्यतेमुळे शहरवासीयांमध्ये समाधानाचे वातावरण असून, लवकरच या कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. या सर्व कामांसाठी शासनाच्या नगर विकास विभागाने६४ कोटी ६५ लाख २४ हजार ६१६ रुपयांच्या निधी प्रशासकीय मान्यता दिली आहे. यावेळी नगराध्यक्ष श्री.शिंदे म्हणाले, महाबळेश्वर शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या अनुषंगाने अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे व मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांचे सहकार्याने व प्रशासनाच्या पाठपुरव्या मुळे हा निधी उपलब्ध झाला आहे.महाबळेश्वर शहरातील नागरिकांच्या वतीने व सर्व पदाधिकारी यांच्या वतीने आभार व्यक्त करून या निधीमुळे शहराच्या पायाभूत सुविधामध्ये मोठी वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## तंत्रज्ञानाचा उपयोग ज्ञान प्राप्तीसाठी करा : प्रा.वासाडे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, राजुरा (चंद्रपूर) :** तंत्रज्ञानाने संपूर्ण जग व्यापलेले आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा झपाट्याने वापर होत आहे. तंत्रज्ञानाच्या बळावर संपूर्ण जग जवळ आलेले आहे. माहितीचा खजाना सर्वांसाठी खुला झालेला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांने तंत्रज्ञानाचा उपयोग आपली गुणवत्ता वाढवण्यासाठी व ज्ञानप्राप्तीसाठी करावा, असे प्रतिपादन राज्य पुरस्कार प्राप्त प्राचार्य सुधा वासाडे यांनी गोवरी येथे केले. शिवाजी हायस्कूल गोवरी च्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, लाठी येथील प्राचार्य वासाडे मार्गदर्शन करीत होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. के. आर. टेंभुर्णे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आक्सापूर हायस्कूलचे मुख्याध्यापक अतुल कासनगोटूवार, इंदिरा गांधी हायस्कूल, चेकदरुर चे मुख्याध्यापक संजय वागदरकर यांची उपस्थिती होती.

प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षक आनंद चलाख, सुनील काकडे, बी.बी उपरे, हरीश बुटले यांची उपस्थिती होती. याप्रसंगी मुख्याध्यापक कासनगोटूवार यांनी व्यसनाधीनता आणि विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने तसेच करिअर गायडन्स या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच मुख्याध्यापक संजय वागदरकर यांनी मूल्यधिष्ठ शिक्षण यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणातून एक संवेदनशील व जबाबदार नागरिक घडावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. अध्यक्ष मनोगतातून डॉ. टेंभुर्णे यांनी उत्तुंग ध्येय ठेवून परिश्रम करा, जीवनात यश मिळेल असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद चलाख यांनी केले संचालन सानिया भगत आणि तन्वी काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन चांदणी पोतराजवार हिने मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अभिजीत कुळसंगे, अरुण उरकुडे, शंकर लांडे ,अनिल डाखरे यांनी सहकार्य केले.

# १६ हजार घरांना घरपट्टे वाटपाची प्रक्रिया गतीने सुरु - चंद्रशेखर बावनकुळे

## महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ चार जाहीर सभा संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** आजची सभा केवळ निवडणुकीसाठी नाही, तर चंद्रपूरच्या भविष्याची दिशा ठरविणारी सभा आहे. शब्द नाही, काम हे आमचे ब्रीद आहे. १६ हजार घरांना कायम स्वरूपी घरपट्टे देण्याचा ऐतिहासिक निर्णय आपण घेतला आहे. ही केवळ घोषणा नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. अनेक कुटुंबांना घरपट्टे मिळाले असून आता त्यांच्या घरांचे स्वामित्व अधिकृतपणे त्यांच्या नावावर येणार आहे. हे घरपट्टे म्हणजे फक्त कागद नाहीत, तर तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्याची हमी असल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. महानगरपालिकेतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज तुकुम येथील चवरे ले-आऊट, शामनगर, बाबूपेठ येथील नेताजी चौक, तसेच भिवापूर येथील माता नगर येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले होते. या सभांना संबोधित करताना ते बोलत होते. या सभांना जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके,



आ. किशोर जोरगेवार, आ. कीर्तिकुमार भांगडिया, माजी आमदार सुधीर पालवे, संजय बोदकुलवार, संजीव कुमार रेड्डी, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष रवींद्र शिंदे यांच्यासह महायुतीचे उमेदवार आणि पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ना. बावनकुळे म्हणाले की, भाजप सरकार सामान्य माणसाच्या घरापासून ते शहराच्या विकासापर्यंत ठोस काम करत आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, घरपट्टे, मालमत्ता हक्क हे विषय आम्ही निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता शासनाच्या अजेंड्यावर कायम ठेवले आहेत. चंद्रपूर शहराचा सर्वांगीण विकास करायचा असेल, तर महानगरपालिकेत भाजपचा महापौर आणि महायुतीचे सक्षम नगरसेवक असणे अत्यंत गरजेचे आहे. विकासाची गती कायम ठेवायची असेल, तर केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्थानिक पातळीवर राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आ. सुधीर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार यांच्यासारख्या विकासाभिमुख नेतृत्वाला बळ देणे आवश्यक आहे. आम्ही ड्रोन सर्वेक्षणाद्वारे घरांचे मॅपिंग करून नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड, नकाशे आणि स्वामित्व हक्क मोफत देण्याचे काम करत आहोत. यासाठी लागणारा खर्च सरकार उचलणार आहे. काही भागांत आपण पट्टे वाटपही केले आहे. आपल्या भागातील पट्टे वाटप प्रक्रिया गतीशील रितीने पुढे जात असून, पुढील काही दिवसांत तुमच्या घराचा मालकी हक्काचा पट्टा तुमच्या हातात असणार आहे. आपण लाडक्या बहिणींच्या खात्यात अधिकचे पैसे जमा करणार आहोत. मात्र काँग्रेसशासित राज्यांमध्ये अशा योजना बंद करण्यात आल्या आहेत आणि आता महाराष्टातही ही योजना बंद करण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे. सध्या लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे टाकू नका, असे पत्रच काँग्रेस पक्षाच्या वतीने काढण्यात आले आहे. त्यामुळे लाडकी बहिण योजना बंद करायला निघालेल्या काँग्रेसरूपी रावणाचा अंत या निवडणुकीत करण्याचे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. आपण सूर्यघर योजनेअंतर्गत येथील नागरिकांना सूर्यघर लावून देणार आहोत. त्यामुळे पुढील १५ वर्षे नागरिकांना विजेचे बिल येणार नाही. विकासावर विश्वास ठेवा, काम करणाऱ्या नेतृत्वावर विश्वास ठेवा. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. या सभांना नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

# मुदखेडच्या उपनगराध्यक्ष पदाची लॉटरी कोणाला ?

## चव्हाण, मच्छीवाले, आऊलवार, चंद्रे यांच्या नावाची चर्चा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, मुदखेड (नांदेड) :** नगराध्यक्षपदी विशांती माधव कदम विराजमान झाले असून आता उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, नवनिर्वाचित नगरसेवक इम्रान मच्छीवाले ,संजय आऊलवार, श्याम चंद्रे इच्छुक असून लॉटरी कोणाला लागणार याकडे लक्ष लागले आहे. यापैकी कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब लागणार की नंतर बंद पॅकेट मध्ये कोणाचे नाव येणार हेच पहावे लागणार आहे .

नगरपरिषद निवडणुकीत २० पैकी भाजपचे १४ नगरसेवक निवडून आले असून स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजपा गटनेतेपदी सुनील शेट्टे यांची निवड करण्यात आली आहे. उपनगराध्यक्ष पदाची निवड दि.१३ मंगळवारी रोजी करण्याचा मुहूर्त ठरला आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण इच्छुक असून माजी आमदार अमर राजूरकर यांचे ते विश्वासू म्हणून ओळखले जातात. पक्ष






संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर असून उपनगराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवून शहर विकासाला प्राधान्य देण्यासाठी पक्षश्रेष्ठी यांच्या नावाचा विचार करू शकते. या निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी भाजप चेहऱ्याला पसंदी दिली असून गेल्या १५ वर्षापासून सातत्याने इम्रान मच्छीवाले नगरसेवक पदाच्या माध्यमांतून लोकसेवेचे कार्य करत आहेत.

याशिवाय अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख असून मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देण्याचा विचार झाल्यास इम्रान मच्छीवाले यांची लॉटरी लागू शकते. नवनिर्वाचित नगरसेवक संजय आऊलवार उपनगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत असून व्यापारी चेहरा म्हणून समोर आल्यास खासदार अशोक चव्हाण यांच्या बंद पाकीट मधून यांचे नाव येऊ शकते. समाजकार्यात अग्रेसर असलेले नवनिर्वाचित नगरसेवक श्याम चंद्रे यांनी १५ वर्षाच्या कार्यकाळात स्वतःच्या प्रभागात स्वखर्चातून सार्वजनिक उपक्रम राबवून एक वेगळीच छवी निर्माण केली आहे.

गेल्या पंचवार्षिक निवडणुकीतही त्यांची उपनगराध्यक्ष पदाची संधी हुकली असून खासदार अशोक चव्हाण यांची विश्वासू असल्याने त्यांना उपनगराध्यक्ष पदाची ही संधी मिळू शकते. नगरपरिषदेत दोन भाजप कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्य पदाची संधी मिळणार आहे. भाजप पक्षाकडून अनेक जणांना निवडणूक काळात स्वीकृत सदस्य पदाचे आश्वासन देण्यात आले आहे.

या पदासाठी राम अबादार, पत्रकार ईश्वर पिन्नलवार, कपिल लोखंडे, ऋषिकेश पारवेकर यांच्यासह अनेक जण इच्छुक आहेत. भाजप नेत्यांचे गाठी भेटी घेत असून स्वीकृत सदस्य पदी वर्णी लागावी यासाठी फिल्डिंग लावत आहेत. या पदासाठी पत्रकार ईश्वर पिन्नलवार, पारवेकर बंधू, राम आबादार यांच्या नावाची चर्चा ऐकावयास मिळत आहे. उपनगराध्यक्ष पदाची तसेच स्वीकृत सदस्याची निवड होणार असल्याने नेमकी लॉटरी कोणाची लागणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

# मनपा निवडणुकीसाठी मतदान यंत्र सज्ज

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक येत्या १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहेत. या अनुषंगाने चंद्रपूर महानगरपालिका मतदारसंघात मशीन तयार करण्याची प्रक्रिया मनपा झोन क्रमांक ३ कार्यालयात शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आली.

सदर प्रक्रियेसाठी उमेदवार तसेच विविध राजकीय पक्षांचे अधिकृत प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीत मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम यंत्रांची तपासणी, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटची जुळणी, सिलींग तसेच तांत्रिक चाचणी करण्यात आली. यै प्रक्रियेचा मुख्य उद्देश मतदान यंत्रे पूर्णत: कीर्यक्षम, सुरक्षित व त्रुटीविरहित असलेयाची खात्री करणे, तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत पारदर्शकता व विश्वास निर्माण करणे हा आहे. संपूर्ण प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यात आली. चंद्रपूर महानगरपालिका मतदारसंघात एकूण ३५५ मतदान केंद्रे आहेत. यासाठी १५५० बॅलेट युनिट, ७२० कंट्रोल युनिट उपलब्ध



आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याकरीता निवडणूक विभागामार्फत विविध कार्ये केली जात आहेत.

यात निवडणूक कर्तव्यावर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता टपाली मतपत्रिका उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याकरीता सुविधा केंद्र ९, १०, ११, व १२ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवण्यैत आले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मतदारांना मतदान स्लिप ब्लॉक लेव्हल अधिकाऱ्यांमार्फत पोहोचेल याची खातरजमा करण्यात येत आहे. मतदारसंघ क्षेत्रात सकाळ व संध्याकाळ मिळून १६ स्थिर निगराणी स्थळे ठेवण्यात आली असून त्यांचे मार्फत २४ बाय ७ वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. मतदान केंद्रांवर मतदान यंत्रे पोहचवणे व परत आणणाऱ्या प्रत्येक वाहनांवर जीपीएस यंत्रणा लावण्यात येणार आहे.

**अशी असते प्रक्रिया :**

ईव्हीएम यंत्र तयार करण्याची प्रक्रिया ही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर केली जाते. यात मतपत्रिका बॅलेट युनिटला लावून सील करणे, प्रत्येक उमेदवाराला मतदान करुन बघणे (मॉकपोल), मतदान झाल्यानंतर डाटा जुळवून बघणे, त्यानंतर कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट सील करुन स्ट्रॉंग रुममध्ये ठेवण्यात येते. प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान पथकाला मशीनचे वाटप केले जाते.

यावेळी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अकुनुरी नरेश, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त संदिप चिद्रावार, निवडणूक कर्मचारी तसेच निवडणुकीत उभे असलेले उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

